# करनिर्धारण व संकलन खाते
# जकात विभाग
# बृहन्मुंबई महानगरपालिका
# माहितीचा अधिकार अधिनियम, 2005
# अन्वये
# दिनांक 31.07.2021 पर्यंत अद्ययावत
# केलेली पुस्तिका

जनसंपर्क अधिकारी, मुंबई महानगरपालिका
द्वारा प्रकाशित

माहितीचा अधिकार अधिनियम 2005

**जनसंपर्क अधिकारी,मुंबई महानगरपालिका यांजद्वारे प्रकाशित**

**अनुक्रमणिका**



| अ.क्र. | मॅन्युअल क्रमांक | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 1 | संस्थेची रचना, कार्ये आणि कर्तव्ये यांचा तपशील | |
| 2 | 2 | संस्थेचे अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये | |
| 3 | 3 | पर्यवेक्षण व जबाबदारीनुसार निर्णय घेण्याच्या प्रकियेतील कार्यपध्दती | |
| 4 | 4 | संस्थेची कर्तव्ये पार पाडण्याकरीता विहित केलेली प्रमाणपध्दती | |
| 5 | 5 | कार्य पार पाडण्यासाठीचे नियम, विनियम, अनुदेश, मॅन्युएअल आणि अभिलेख | |
| 6 | 6 | संस्थेच्या अधिपत्याखाली व ताब्यात असलेल्या दस्तऐवजाचा विगतवारीनुसार तपशिल | |
| 7 | 7 | संस्थेचे धोरण आखणे व ते कार्यवाहीत आणणे यासंबंधात जनतेतील कोणाही व्यक्तीशी सल्लामसलत करणे व त्यांच्या अभिवेदनासाठी कोणतीही व्यवस्था आस्तित्वात असल्यास त्या संबंधीचा तपशिल | |
| 8 | 8 | संस्थेचा भाग असलेली वा संस्थेला सल्ला देण्यासाठी दोन किंवा अधिक सदस्य संख्या असलेले मंडळ, परिषद, समिती स्थापन करण्यात आली असल्यास त्याची माहिती व अशी मंडळे, समित्या आणि इतर संस्था, त्यांच्या सभा नागरीकांना खुल्या आहेत किंवा अशा सभांचे इतिवृत्त जनतेस उपलब्ध आहे का याची माहिती | |
| 9 | 9 | अधिकारी व कर्मचारी या संबंधीची निर्देशिका | |
| 10 | 10 | संस्थेचा प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणारे मासिक वेतन व नियमानुसार देण्यात येणा-या पूरक भत्त्यासंबंधीची कार्यप्रणाली | |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | 11 | महापालिकेच्या प्रत्येक विभागासाठी केलेली अर्थसंकल्पीय तरतूद, अंदाजीत प्रस्तावित खर्च व खर्च वाटपाचा अहवाल यासंबंधी माहिती | |
| 12 | 12 | अर्थसहाय्य कार्यक्रमांतर्गत नियोजित केलेली रक्कम व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याच्या पध्दती तसेच नियोजित केलेली रक्कम व अशा कार्यक्रमांच्या लाभार्थींचा तपशील | |
| 13 | 13 | संस्थेकडून देण्यात येणारी सवलत, परवाना व प्राधिकारी व त्यांचे लाभार्थी यांचा तपशील | |
| 14 | 14 | इलेक्ट्रॉनिक स्वरूपात संक्षिप्त केलेली व उपलब्ध करून देण्यात येणा-या माहितीचा तपशिल | |
| 15 | 15 | नागरिकांना माहिती मिळविण्याकरीता संस्थेकडून उपलब्ध असलेल्या सुविधा व ग्रथांलय असल्यास त्यांच्या कामकाजाच्या वेळा | |
| 16 | 16 | सार्वजनिक माहिती अधिका-यांची नांवे, पदनामे व इतर माहिती | |
| 17 | 17 | विहित करण्यात येणारी इतर सर्वसाधारण माहिती | |

# बृहन्मुंबई महानगरपालिका
# करनिर्धारण व संकलन खाते
# जकात विभाग
# परिचय

केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांचा भाग म्हणून दि. 01.07.2017 पासून वस्तू व सेवा कराची अंमलबजावणी सुरु झाली. त्यामुळे जकात कर रद्द होऊन जकात कर वसुली बंद करण्यात आली. त्यामुळे जकात नाके व कार्यकेंद्रे येथील दैंनदिन कामकाज बंद झाले आहे.

दि.01.07.2017 पूर्वी जकातीचा भरणा केलेला माल जर वापर, उपभोग वा विक्री न करता आयात करण्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत जर निर्यात करण्यात आला तर जकातीच्या रक्कमेच्या 10% रक्कम हि जकात वसुलीसाठी व परताव्यासाठी आकारण्यात येणारे प्रशासकीय शुल्क म्हणून महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा करण्यात येऊन उर्वरित 90% रक्कमेचा परतावा देय आहे.

दि.01.07.2017 पूर्वी मुंबई महानगरपालिका अधिनियम,194 (अ) अन्वये एन प्रपत्र अंतर्गत जकात माफी देण्यात येत होती. सदर माल 168/72 तासांच्या आत म.न.पा कर्मचा-यांच्या देखरेखीखाली निर्यातीचा दाखला घेऊन मुंबई बाहेर निर्यात होणे आवश्यक होते. अशाप्रकारे निर्यातीचा दाखला न घेता मुंबईबाहेर निर्यात झालेल्या एन प्रपत्राबाबतच्या मागणीपत्राचा निपटारा जकात नियमावली क्र. 11 (c) पक्षकाराने सादर केलेल्या कागदपत्रानुसार अनुसार सक्षम अधिका-याच्या मंजुरीने सदर एन प्रपत्र मागणीपत्रातील जकात माफ करण्यात येते.

दि.01.07.2017 पूर्वी बृहन्मुंबईच्या हद्दीत दुरुस्ती, निरीक्षण, प्रदर्शन, प्रात्यक्षिक,प्रक्रीया इ. करिता आयात करण्यात येणा-या मालावर जकात नियमावली 1965 अंतर्गत नियम क्र.07 व 08 भाग 2 अन्वये वर नमूद केलेल्या कारणाकरिता आयात करण्यात येणा-या वस्तूवरील जकातीच्या रक्कमेइतकी तात्पुरती अनामत रक्कम स्वीकारुन किंवा कायम अनामत रक्कम स्वीकारुन जकात कर माफी देण्यात येत होती. जर अशा वस्तू त्यांच्या स्वरुपात काही बदल न होता सहा महिन्यांच्या आत निर्यात करण्यात आल्या तर स्वीकारलेल्या तात्पुरत्या अनामत रक्कमेचा परतावा देय आहे. जकात कर रद्द झाल्यामुळे अर्ज व कागदपत्रे

सादर केलेल्या पक्षकारांना कागदपत्रांच्या तपासणीअंती कायम अनामत रक्कमांचा परतावा देय आहे.

दि.01.07.2017 पासून जकात बंद झाल्यानंतर आर , एन, इपी, सीसी प्रपत्राबाबत निर्यातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी, जकात नाक्यावरील प्रलंबित कामकाज पाहण्यासाठी अधीक्षकांच्या देखरेखीखाली पर्यवेक्षी निरीक्षक, जकात निरीक्षक, मुख्य लिपिक, लिपिक यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर प्रलंबित कामकाज जकात नाके व कार्यकेंद्रेनिहाय करण्यात येत होते.

सन 2018 पासून प्रशासकीय सोयीसाठी सदर प्रलंबित कामकाज जकात मुख्यालय कांजूरमार्ग येथे उप करनिर्धारक व संकलक (जकात) यांच्या अधिपत्याखालील पाहिले जात आहे.याकरिता सहा.क.व.सं, अधिक्षक, पर्यवेक्षी निरीक्षक, जकात निरीक्षक तसेच प्रशासकीय अधिकारी , मुख्य लिपिक , लिपिक इ. जकात मुख्य कार्यालयात नियुक्त करण्यात आले आहे.

सदर अधिकारी/कर्मचारी जकात परतावा, एन, आर प्रपत्र मागणीपत्राबाबत कार्यवाही, लेखा टिप्पण्या/ परिच्छेद, कॅग, स्थानिक निधी लेखा परिच्छेद, बँक गॅरंटी इ. बाबत कार्यवाही, विविध न्यायालयीन प्रकरणाबाबत विधी विभागाशी समन्वय साधून कार्यवाही पार पाडणे इ.कामे पार पाडत आहेत.